# ग्राहकांचे हक्क

1 अपायकारक वस्तुंच्या विक्रयापासून जीवीत व मालमत्तेचे संरक्षण

1 दर्जा,वजन,गुणकारिता,शुध्दता मानक व किंमत याबाबतच्या अनुचित व्यव्हारासंबंधीची माहिती मिळणे

3 एकाच प्रकारच्या विविध व स्पर्धात्मक किमतीच्या वस्तुंच्या सुगम उपलब्धतेची आणि निवडीची हमी.

4 ग्राहक हितासंबंधी आपले म्हणणे ऐकले जाण्याची/विचारात घेतले जाण्याची हमी.

5 पिळवणूक व अनुचित व्यापारी व्यवहाराविरुध्द गाऱ्हाण्याची दाद व निराकरण.

# दुय्यम शिधापत्रीका साठी लागणारे कागदपत्रे

1. विहीत नमुन्यात विनंती अर्ज
2. प्रतिज्ञा लेख
3. रहिवाशी दाखला (पोलीस पाटील/सरपंच/तलाठी)
4. रा.भा.दुकानदाराचा दाखला
5. रेशन कार्ड हरविले असल्यास पोलीस स्टेशन अहवाल
6. तलाठी उत्पन्न दाखला
7. कार्डातील व्यक्तींचे आधार कार्डची झेरॉक्स प्रत

# पुरवठा पत्रिका/शिधापत्रिका शिधा वस्तुंसाठीच दिलेली आहे. अन्य कोणत्याही पुराव्यासाठी नाही.

1 शिधापत्रीका ही शासकीय मालमत्ता असून ती सुरक्षित ठेवण्यास शिधापत्रिकाधारक जबाबदार आहे.

1 शिधापत्रीकेतील वस्तु खरेदी करुन रास्त भाव दुकान सोडण्यापुर्वी पावतीवर लिहिलेल्या वस्तु,वजन,किंमत इ.नोंदीच्या अचूकतेबद्दल खात्री करुन घ्यावी

3 कोणतीही तक्रार असल्यास रास्त भाव दुकानात ठेवलेल्या तक्रारवहीत नमूद करा. तक्रार पुस्तकाची मागणी केल्यानंतर दुकानदाराने ते दिलेच पाहीजे.

4 एकाच व्यक्तीच्या नावे एकापेक्षा अधिक शिधापत्रिका मिळविणे वा मिळविण्याचा प्रयत्न करणे हा कायद्याने गुन्हा आहे.

5 आपली शिधापत्रिका दुसऱ्यास वापरावयास देऊ नका. दुसऱ्याची शिधापत्रिका वापरु नका. कुटुंबातील कुणीही व्यक्ती महिन्यापेक्षा जास्त काळ परगावी असल्यास तिच्या युनिटवरील शिधा घेऊ नका. स्थलांतर केल्यास कार्यालयाकडून नाव कमी करुन घ्या.

# रेशनकार्ड मध्ये नांव समाविष्ठ करण्यासाठी लागणारे कागदपत्रे

1. विहीत नमुन्यात विनंती अर्ज
2. दुकानदाराचा दाखला
3. माहेरकडील पुरावा/तहसिलदार यांचे नाव कमी केल्याचे प्रमाणपत्र
4. मुळ रेशन कार्ड
5. आधार कार्डची झेरॉक्स प्रत

# रेशनकार्ड मधिल नांव कमी करण्यासाठी लागणारे कागदपत्रे

1. विहीत नमुन्यात विनंती अर्ज
2. दुकानदाराचा दाखला
3. लग्न पत्रिका/ मृत्यु प्रमाणपत्र
4. मुळ रेशन कार्ड
5. आधार कार्डची झेरॉक्स प्रत

# महात्मा फुले प्रमाणपत्रासाठी लागणारे कागदपत्रे

1. विहीत नमुन्यात विनंती अर्ज
2. मुळ रेशन कार्ड

# नविन रेशनकार्ड साठी लागणारे कागदपत्रे

1. विहीत नमुन्यात विनंती अर्ज
2. प्रतिज्ञा लेख
3. रहिवाशी दाखला (पोलीस पाटील/सरपंच/तलाठी)
4. दुकानदाराचा दाखला
5. तलाठी उत्पन्न दाखला
6. माहेरकडील पुरावा/तहसिलदार यांचे नाव कमी केल्याचे प्रमाणपत्र
7. ग्रामपंचायत नमुना ८ अ/ असेसमेंट नक्कल(नगर पालीका)
8. स्थळ निरीक्षण अहवाल
9. कार्डातील व्यक्तींचे आधार कार्डची झेरॉक्स प्रत

# रहिवासाचा पुरावा म्हणुन शिधापत्रिकेचा वापर न करणे

शिधापत्रिका ही या विभागाकडुन संबंधित कुटुंबाला रास्त भाव दुकानातुन केवळ शिधावस्तु उचलण्यासाठी दिलेली आहे. अन्न ही एक प्राथमिक गरज आहे व ती पूर्ण होण्याकामी रास्त भावाने शिधावस्तु देण्याच्या मानवतेच्या दृष्टीकोणातुन शिधापत्रिका देण्यात येते. त्यामुळे शिधापत्रिका असणे किंवा तिाा वापर होणे हा संबंधीत व्यक्ती/ कुटुंबाचा निवासाचा पुरावा होवु शकत नाही.